जिल्हा क्रीडा संकुल, बीड या क्रीडा संकुलाच्या रु.२४.९५ कोटी किमतीचे अंदाजपत्रक व निधी मंजूरीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक:-ई नस्ती क्र. १७३६५५७/क्रीयुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दि. १६/०७/२०२६

वाचा:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.राक्रीधो-२००३ / प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दि.२६.०३.२००३
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००४/प्र.क्र.११०/ क्रीयुसे-१, दि.०७.१२.२००५.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००९/प्र.क्र.२५/०९/ क्रीयुसे-१, दि.२१.०३.२००९.
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/ क्रीयुसे-१, दि.२३.०३.२०२२
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.क्रीडाधो-२०२२/प्र.क्र.१३१/ क्रीयुसे-१, दि. ०४.१०.२०२२
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.विक्रीस११२४/प्र.क्र१५९/ क्रीयुसे-१, दि.२७.०९.२०२४
७) राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.०६.०६.२०२५ च्या बैठकीचे इतिवृत्त.
८) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, यांचे पत्र क्र.जिविक्रीसं/ निमा/निवि/२०२५-२६/का.९/२०२१, दि.०९.०६.२०२५.
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.जिक्रीसं३०२५/प्र.क्र.९७/क्रीयुसे.१, दि.०६.०८.२०२५.
१०) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, यांचे पत्र क्र.जिक्रीसंबीड/सुप्रमा/ उसमंत्रिमंमा/२०२५-२६ /का.९/८४३७, दि.२६.०३.२०२६.

प्रस्तावना:-

जिल्हा क्रीडा संकुल, बीड करिता यापूर्वी रु.८००.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला होता. तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून जिल्हा क्रीडा संकुल, बीड या सकुलाच्या रु.२४.९९ कोटी किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती व राज्य मंत्रिमंडळाची मान्यता मिळणेबाबत संदर्भ क्र.१० येथील प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावामध्ये ४०० मी. सिंथेटिक धावनपथ अद्ययावत करणे, फुटबॉल/ हॉकी मैदान (नॅचरल टर्फ मैदान) आणि ट्रॅकच्या बाजुने व मुख्य मैदान येथे आर.सी.सी. ड्रेनेजचे काम करणे, व्हॉलीबॉल, कब्बडी, खो-खो व लांब उडीचे मैदान विकसित करणे, इंडोर हॉल इमारत अद्ययावतीकरण व सुधारणा करणे, वसतिगृह इमारतीच्या तिसरा मजल्याचे बांधकाम करणे व तळ मजल्याचे अद्ययावतीकरण करणे, मुख्य प्रवेशद्वार (गेट नं.३) मध्ये सुधारणा करणे, वॉचमन कॅबिनचे बांधकाम करणे, कंपाऊंड वॉल व चेन लिंक फेन्सिंग चे बांधकाम करणे, संकुलाकरिता रेन वॉटर हार्व्हेस्टिंग सिस्टीम तयार करणे, जोड रस्त्याचे काम करणे, मुख्य प्रवेशद्वार (गेट नं.३) मध्ये सुधारणा करणे, वॉचमन कॅबिनचे बांधकाम करणे, कंपाऊंड वॉल व चेन लिंक फेन्सिंग चे बांधकाम करणे, संकुलाकरिता रेन वॉटर हार्व्हेस्टिंग सिस्टीम तयार करणे, जोड रस्त्याचे काम करणे, पार्किंगच्या जागेचा विकास करणे, खेळाची मैदाने व परिसराचे बाह्य विद्युतीकरण करणे, सकुलातील सर्व इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रना बसविणे, जॉगिंग ट्रकचा विकास करणे इ. कामांचा समावेश आहे.

२. महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण, २००१ अन्वये महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत राज्यात क्रीडा विषयक सोयी सुविधा निर्माण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले. तसेच सन २०१२ च्या राज्य क्रीडा धोरणास अनुसरून शासन निर्णय, दिनांक २३.०३.२०२२ अन्वये क्रीडा संकुलांची शासन अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

(अ) नव्याने प्रशासकीय मान्यता दिलेल्या, परंतु अद्याप बांधकाम सुरु झालेले नाही, अशा क्रीडा संकुलांबाबत सुधारीत अनुदान मर्यादा:-

क्रीडा संकुलाचा प्रकार	सुधारीत अनुदान मर्यादा लाखात
तालुका क्रीडा संकुल	रु.५००.०० लक्ष
जिल्हा क्रीडा संकुल	रु.२५००.०० लक्ष
विभागीय क्रीडा संकुल	रु.५०००.०० लक्ष

(ब) अंदाजपत्रक/सुधारीत अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता/सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेल्या/ बांधकाम पूर्ण झालेल्या /बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या /अपूर्ण क्रीडा संकुलांबाबत सुधारीत अनुदान मर्यादा:-

क्रीडा संकुलाचा प्रकार	सुधारीत अनुदान मर्यादा (रु.लाखात)
तालुका क्रीडा संकुल	रु. ३००.०० लक्ष
जिल्हा क्रीडा संकुल	रु. १५००.०० लक्ष
विभागीय क्रीडा संकुल	रु. ३०००.०० लक्ष

३. क्रीडा संकुलांचे अंदाजपत्रक, आराखड्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासाठी शासन निर्णय दि.२६.०३.२००३ अन्वये मा. मंत्री, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीस राज्य क्रीडा धोरणात अभिप्रेत असलेल्या योजनांना मान्यता देण्याचे अधिकार आहेत. राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.०६.०६.२०२५ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार जिल्हा क्रीडा संकुल, बीड या क्रीडा संकुलाच्या रु.२४९९.९६ लक्ष च्या अंदाजपत्रकास मा. मंत्रिमंडळाची कार्योत्तर मान्यता घेण्याच्या अधीन राहून संदर्भ क्र.९ येथील शासन निर्णयान्वये विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

५. उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक १७.०६.२०२६ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार जिल्हा क्रीडा संकुल, बीड या क्रीडा संकुलाच्या रु.२४.९५ कोटी किमतीचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या दि.१४.०७.२०२६ च्या बैठकीसमोर ठेवण्यात आला होता. मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार जिल्हा क्रीडा संकुल, बीड या क्रीडा संकुलाच्या रु.२४.९५ कोटी किमतीचे अंदाजपत्रक व निधी मंजूरीस कार्योत्तर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

जिल्हा क्रीडा संकुल, बीड या क्रीडा संकुलाच्या रु.२४.९५ कोटी किमतीचे अंदाजपत्रक व निधी मंजूरीस विशेष बाब म्हणून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. सिंथेटीक ॲथलेटीक ट्रॅकच्या कामासाठी राष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त व अनुभवी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात यावी व अशा नियुक्त कंत्राटदाराकडून ते काम करण्यात यावे.

३. कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे.

४. उक्त अंदाजपत्रकामध्ये यापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरित केलेल्या कोणत्याही कामाचा समावेश नसल्याची आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांनी खात्री करणे आवश्यक राहील. एकाच कामासाठी दोनदा निधी वितरित / खर्च झाल्यास यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय जबाबदार राहतील.

५. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.१४.०७.२०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१६१६२०१३७८४२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK HANMANLU DAMAYYAWAR

Digitally signed by ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=A72A631BF4E6911D7FAC836DDFB07663FE2C2481CDDF39 9C406576B02F63BCD8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2CC45C1C1345A8B6FF1E9FDBD2D12C6527F6D070C0 5B708BCC57B79B7EF3A95D, cn=ASHOK HANMANLU DAMAYYAWAR
Date: 2026.07.16 16:21:07 +05'30'

(अशोक ह. दमय्यावार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव,
५. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
७. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा / विधानपरिषद, यांचे स्वीय सहायक, मुंबई.
१०. सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
११. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग यांचे स्वीय सहायक.
१२. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१५. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
१६. जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, बीड (संचालनालयाद्वारे)
१८. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (संचालनालयाद्वारे)
१९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. निवड नस्ती (क्रीयुसे-१).